# - प्रेस नोट -

दि. ०९/०७/२०२६

## मानखुर्द पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि. ०७/०७/२०२६ रोजी फिर्यादी महिला वय ५२ वर्षे, धंदा-गृहीणी, रा.ठी- मानखुर्द, मुंबई यांचा जावई दादाराव गायकवाड यांना सोरटनाका, अण्णाभाऊ साठेनगर, मानखुर्द, मुंबई येथे अटक आरोपी क्रमांक ०१ पुरुष वय-१९ वर्षे व अटक आरोपी क्रमांक ०२ पुरुष वय-१९ वर्षे यांनी शिवीगाळ करून त्यांच्या खिशातील २२००/- रु जबरदस्तीने काढून घेतले व सदरचे पैसे परत मागितले असता आरोपीतांनी दादाराव गायकवाड यांना खाली जमिनीवर पाडुन त्यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांच्या हातातील चाकुने पाठीत व उजव्या बरगडीवर पाच ते सहा वार करून गंभीर जखमी केले तसेच तेथील जमलेल्या लोकांना कोणी वाचवण्यास आल्यास जीवे ठार मारू अशी धमकी दिली, म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. ०७/०७/२०२६ रोजी गु.र.क्र. ३६०/२६, कलम १०९,३११,११८(२),११८(१),३५१ (२),३५२,३(५) बीएनएस २०२३ सह ४,२५ सशस्त्र अधिनियम सह कलम ३७(१)(अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

----------------------